ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 10 | November - 2016

Indian Streams Research Journal

# ग्रामसेवकांच्या भूमिकेचे विश्लेषणात्मक अध्ययन: निफाड तालुक्या संदर्भात अभ्यास

प्रा.नितीन जाधव [१] , प्रा.डॉ.सुरेंद्र अंबर मोरे[२]

[१]सहाय्यक प्राध्यापक , राज्यशास्त्र विभाग, के. जी. डी. एम. कॉलेज, निफाड. जि. नासिक.
[२]सहयोगी प्राध्यापक , राज्यशास्त्र विभाग प्रमुख, झेड.बी.पाटील महाविद्यालय, धुळे. जि. धुळे.

गोषवारा :- (Abstract)

स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये विशेषत:ग्रामपंचायत कारभारामध्ये प्रशासकीय घटकांची भूमिका महत्वपुर्ण आहे. सुशासन प्रस्थापित करण्याचे आणि ग्रामपंचायतीचे दैनंदिन कार्य प्रशासकीय घटक पार पाडतात. प्रामुख्याने ग्रामसेवक हा ग्रामपंचायतीचा प्रशासकीय प्रमुख असल्याने ग्रामपंचायत कामकाज आणि ग्रामीण विकासाची अंमलबजावणी चे काम देखील तोच करतो. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ६० नुसार प्रत्येक ग्राम पंचायतीसाठी एक ग्रामसेवक असतो. ग्रामसेवक हा जिल्हा परिषदेतील ग्रामविकास खात्याचा वर्ग ३ चा सेवक असुन एका ग्रामपंचायतीसाठी एक अथवा एका पेक्षा अधिक ग्रामपंचायतीसाठी एक ग्रामसेवक असतो. प्रशासकीय प्रमुख या नात्याने ग्रामसेवकांना महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. ग्रामसेवकांच्या भूमिकेचा प्रभाव ग्रामीण विकासावर पडत असतो. पंचायतराज जे उद्दिष्टये समोर ठेउन निर्माण झाले. ती उदिदष्टये साध्य करण्यासाठी प्रशासकीय घटक ची भूमिका महत्वपुर्ण ठरते. ग्रामसेवकांच्या भूमिकेचा अभ्यास करण्यासाठी निफाड तालुक्यातील ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवका प्रतिसादका कडून नमुना निवडी द्वारे अभ्यास करण्यात आला.

## प्रस्तावना :- (Introduction)

पुरातन काळापासून ग्रामीण स्थानिक व्यवस्था चलविण्यासाठी पंचायतीचे अस्तित्व असल्याचे प्राचीन वाडमयावरून दिसुन येते. गावातील लोकांनी संरक्षण मिळवणे, तंटे व संघर्ष पंचामार्फत सोडविण्यासाठी पंचायती निर्माण केल्या. स्वातंत्र्या नंतर महाराष्ट्रामध्ये वसंतराव नाईक समितीच्या शिफारशी नुसार स्थानिक शासन निर्मिती करण्यात आली.

भारतीय राज्यघटनेच्या ४० व्या कलमात स्थानिक शासन स्थापण्याची तरतुद असल्याने देशभर या बाबत पाउले उचलण्यात आले. महाराष्ट्रात १९५८ चा मुंबई ग्रामपंचायत आधिनियमा नुसार ग्रामपंचायतीची स्थापना करण्यात आली. अधिनियमातील कलम ६० नुसार ग्रामसेवकां बाबत तरतुद करण्यात आली. या ग्रामसेवकांच्या भूमिकेचा प्रस्तुत शोधनिबंधात अध्ययन करण्यात आले आहे. नासिक जिल्हयातील निफाड तालुक्यात १२० ग्रामपंचायती असुन २०११ च्या जनगणने नुसार ७२.१६ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करते. या जनतेच्या विकासाची जबाबदारी पंचायतीचा प्रशासकीय प्रमुख या नात्याने ग्रामसेवकांची आहे. ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कामाबरोबर ग्रामपंचायतीने केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ग्रामसेवकांचीच असते. पंचायतीचे आर्थिक बाबीचे हिशोब देखील ग्रामसेवकच पाहतात.

## अभ्यासाचे उद्देश :- (objective of Research)

१. धुळे तालुक्यातील ग्रामसेवकांच्या भूमिकेचे विश्लेषणात्मक अध्ययन करणे.
२. ग्रामीण विकासात ग्रामसेवकांच्या योगदानाचा आढावा घेणे.

## गृहितकृत्य :- (Hypothesis)

ग्रामसेवकांची भुमिक ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कामात व विकास प्रक्रियेत महत्वाची असते.

## संशोधन पध्दती :- (Methodology)

उपलब्ध माहितीच्या आधारे विषयाची मांडणी करण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. निफाड तालुक्यातील ग्रामसेवकांच्या भूमिकेचे विश्लेषणात्मक अध्ययन व ग्रामीण विकासात ग्रामसेवकांच्या योगदानाचा आढावा घेण्यासाठी प्रस्तुत लघुशोध निंबंधासाठी द्वितीयक तथ्ये सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे. प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथांचा आधार घेवून निष्कर्षा पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## व्याप्ती आणि मर्यादा :- (Scope & Limitation)

प्रस्तुत लघुशोध निबंधामध्ये निफाड तालुक्यातील ग्रामसेवकांचा अभ्यास करण्यात आलेला असला तरी त्यापैकी नमुना निवडीद्वारे ग्रामसेवकांची निवड व्यष्टी



अध्ययना साठी करण्यात आलेली आहे. म्हणजेच ग्रामपंचायत कामकाज आणि विकास प्रक्रियेसंदर्भातील ग्रामसेवकांच्या भूमिकेचे अध्ययन करण्यात आलेले आहे. निफाड तालुक्यातील ग्रामसेवकांची भूमिका जाणून घेण्यासाठी प्रत्यक्ष सर्वेक्षणाद्वारे तथ्यसंकलन करताना ग्रामसेवक ग्रामपंचायत कामकाज संदर्भात माहिती देताना राजकीय प्रभावाखाली देत असल्याचे दिसून आले त्यामुळे माहिती मिळताना ही मर्यादा आली.

## संशोधन समस्या :- (Research Problems)

पंचायतराज संस्थाच्या माध्यमातुन ग्रामीण विकास साध्य करताना ग्रामसेवकांचा भुमिका काय असते. याचसंदर्भाने ग्रामसेवकांचा भुमिका काय असते याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

## योगदान :- (Significance)

ग्रामसेवक प्रशासकीय प्रमुख या नात्याने ग्रामपंचायतीचे आर्थिक हिशोबांची जबाबदारी पार पाडतो. तसेच ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक तयार करणे. आणि ग्राम पंचायतीचा वार्षिक अहवाल, आर्थिक हिशोब पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेस सादर करण्याचे कार्य करतात. म्हणुन ग्रामीण विकास प्रक्रियेत आर्थिक जबाबदारी मुळे ग्रामसेवकांचे योगदान महत्वपुर्ण आहे तसेच ग्रामसेवकांची ग्रामसभे संदर्भात ग्रामसभा सभेची नोटीस काढणे, ग्रामसभेच आयोजन करणे, ग्रामसभेत ग्रामस्थांच्या प्रश्नांचे समाधान करणे, ग्रामसभेचा इतिवृत्त तयार करणे इत्यादी जबाबदारी ग्रामसेवकावरच असते. म्हणून ग्रामपंचायतीच प्रशासकीय प्रमुख या नात्याने ग्रामसेवकांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

## ग्रामसेवकांच्या भुमिकेचे विश्लेषण :-

प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी अथवा गट ग्रामपंचायतीसाठी एका ग्रामसेवकाची नेमणूक केली जाते. गावाची लोकसंख्या, विस्तार व पंचायतीचे उत्पन्न विचारात घेउन त्याची नेमणूक केली जाते. जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी त्यांची नेमणूक करतो निफाड तालुक्यात १३४ गावे असून १२० ग्रामपंचायती आहेत. निफाड तालुक्यात ग्रामीण लोकसंख्या जास्त आहे. अशा ग्रामीण जनतेस प्रशासकीय प्रक्रिया सुलभ होणे साठी आणि पंचायतीचे दैनंदिन कामकाज चालण्या साठी ग्रामसेवक हा जिल्हापरिषदेच्या जिल्हा सेवा वर्ग तीन मधील सेवक असतो. ग्रामसेवकांची निवड राज्यसरकारने नेमलेल्या जिल्हा किंवा विभागीय निवड मंडळाद्वारे केली जाते. या मंडळांनी निवडलेल्या ग्रामसेवकांची नेमणूक मुख्य कार्यकारी अधिकारी करतो मात्र त्यांचे अधिकार आणि जबाबदाऱ्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसारच असतात. जिल्हापरिषदेच्या वर्ग तीन सेवक वर्गाच्या सेवाशर्ती व इतर लाभ त्यांना लागू असतात. ग्रामसेवकाच्या मदतीला कारकून किंवा तत्सम सेवक असतो. ग्रामसेवकाला मदत करणाऱ्या सेवकांचा पगार निश्चित करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला असतो.

निफाड तालुक्यातील ग्रामसेवकांची भूमिका पुढील विश्लेषणाद्वारे जाणून घेण्यात आली.

**सारणी क्रमांक- १**
**दैनंदिन कामकाजातील ग्रामसेवकांची भूमिका**

| प्रश्न | होय म्हणणाऱ्या प्रतिसादक ग्रामसेवकांची संख्या (एकुण १५) | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| तुम्ही ग्रामपंचायतीचे दैनंदिन कार्य वेळेवर पार पाडतात का? | १५ | १०० |

स्त्रोत- प्रत्यक्ष पाहाणी - ऑक्टोबर २०१६

उपरोक्त सारणी क्रमांक-१ नुसार ग्रामसेवक प्रतिसादकांचे मते, सर्वच ग्रामसेवक ग्रामपंचायतीचे दैनंदिन कार्य वेळेवर पार पाडतात असे स्पष्ट दिसून येते. ग्रामपंचायतीचे दैनंदिन काम सातत्याने आणि वेळच्यावेळी पार पाडल्यास दप्तर दिरंगाई निर्माण होत नाही. म्हणुनच ग्रामसेवकांची दैनंदिन कामकाजातील भुमिका महत्वाची ठरते.

**सारणी क्र-२**
**आर्थिक हिशोबाबाबत भुमिका**

| प्रश्न | होय म्हणणाऱ्या प्रतिसादक ग्रामसेवकांची संख्या (एकुण १५) | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| तुम्ही ग्रामसभा कामकाजा दरम्यान ग्रामपंचायतीचा आर्थिक हिशोब सादर करतात का? | १३ | ८६.६६ |

स्त्रोत- प्रत्यक्ष पाहाणी - ऑक्टोबर २०१६

वरिल सारणीतील माहितीनुसार ८६.६६ टक्के ग्रामसेवकांनी ग्रामसभा कामकाजा दरम्यान आर्थिक हिशोब सादर केलेला आहे. यावरून ग्रामसेवक प्रतिसादका कडून आर्थिक हिशोबाचा तपशील लोकांपुढे मांडला जातो असे स्पष्ट होते.

सारणी क्र-३
ग्रामसभेत लोकांच्या शंका निरसना बाबत ग्रामसेकांची भूमिका

| प्रश्न | होय म्हणणाऱ्या प्रतिसादक ग्रामसेवकांची संख्या (एकुण १५) | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| तुम्ही ग्रामसभा सदस्या कडुन उपस्थित होणाऱ्या शंका आणि प्रश्नांचे निरसन केले का? | ११ | ७३.३३ |

स्त्रोत- प्रत्यक्ष पाहाणी - ऑक्टोबर २०१६

ग्रामसभा कामकाजा दरम्यान लोकांच्या ग्रामपंचायत कारभार, आर्थिक हिशोब आणि विकास योजना बाबत ग्रामसभा सदस्या कडुन उपस्थित होणाऱ्या शंका आणि प्रश्नांचे निरसन ७३.३३ टक्के ग्रामसेवका कडून केले जाते.

## निष्कर्ष :- (Major findings)

१. ग्रामसेवकांकडून ग्रांमपंचायतीचे दैनंदिन कामे पार पाडले जातात असे दिसून येते.
२. ग्रामपंचायतीचा आर्थिक हिशोब ग्रामसभेपुढे सादर करण्याचे प्रमाण ८६.६६ टक्के असले तरी १३.३४ टक्के ग्रामसेवकांकडून आर्थिक हिशोब सादर केला जात नसल्याचे स्पष्ट होते.
३. ग्रामसभे दरम्यान ग्रामसभा सदस्यांच्या वेगवेगळया प्रश्नांचे निरसन ग्रामसेवका कडून केले जात असल्याचे स्पष्ट होते.
४. ग्रामसेवकांची भूमिका महत्वाची असल्याचे स्पष्ट होते.

## उपाययोजना :-

१. प्रत्येक ग्रामपंचायतीचा हिशोब ग्रामसभा कामकाजा दरम्यान लोकांपुढे मांडला जाण्याची सक्ती करण्यात यावी.
२. ग्रामसभे दरम्यान ग्रामसेवकांकडून शंकाचे निरसन होताना किंवा एखादया प्रश्नाचे उत्तर मिळताना गोंधळ न होण्यासाठी लोकांमध्ये जागृती आणली जावी
३. ग्रामपंचायतीची दैनंदिन कामे यथायोग्य पार पाडण्यासाठी ग्रामसेवकां कडे एकच ग्रामपंचायतीचा कारभार दिला जावा. एकापेक्षा अधिक पंचायतीचा कारभार दिल्यास त्याचा परिणाम कार्यक्षमतेवर होतो.

## समारोप:- (Conclusion)

ग्रामपंचायतीचा प्रशासकीय प्रमुख म्हणून गावाच्या विकासाची चौकट राजकीय पदाधिकाऱ्या बरोबर ग्रामसेवक पार पाडत असतो. एवढेच नव्हे तर विविध विकास कार्याची अंमल बजावणी करताना गावातील वेगवेगळया घटकांशी ग्रामसेवकांचा प्रत्यक्ष संबंध येत असतो. ग्रामीण लोक विकास योजना व तांत्रिक बाबी पासुन अनभिज्ञ असल्याने ग्रामीण जनतेला या बाबीची माहिती देण्याची जबाबदारी ग्रामसेवकांची असते त्याच बरोबर ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना दैनंदिन व्यवहारात आणि विकास कार्यात मार्गदर्शन करावे लागते ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच आणि सदस्य अनुनभवी असतील तर त्यांना ग्रामसेवकाच्या सहकार्याने विकास कार्य करावे लागते अशा प्रसंगी ग्रामसेवकाची भूमिका निर्णायक ठरते. उपरोक्त विश्लेषणातुन ग्रामसेवकांची दैनंदिन कामकाजातील भूमिका, आर्थिक हिशोबांची तपशील ग्रामसभेत मांडले बाबतची भूमिका आणि ग्रामसीत लोकाच्या प्रश्नांचे निरसन करण्यातील भूमिका महत्वाची असल्याचे दिसून येते यावरून ग्रामसेवक सकारात्मक भूमिका पार पाउत असल्याच स्पष्ट होते.

## संदर्भ ग्रंथ :- (Reference)

१. वा.भा. पाटील, पंचायत राज, प्रशांत पब्लिकेशन्स, प्रथमावृत्ती, जळगाव, २००९.
२. व्ही. बी. पाटील, पंचायतराज, के सागर पब्लिकेशन, पुणे, २००५.
३. शांताराम भोगले, भारतातील स्थानिक शासन, विदया प्रकाशन नागपूर.
४. आर.जी. मुळीक, पंचायती राज्य, प्रथमावृत्ती, सांगली, १९९८.
५. अर्जूनराव दर्शनकार, पंचायतराज आणि नागरी प्रशासन, कैलाश पाब्लिकेशन्स, औरंगाबाद.
६. भांडारकर पु.ल., सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विदयापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, १९८७.
७. डॉ. एस. आर्जुने, पंचायतराज व्यवस्था व बदलती समिकरणे हा संशोधन लेख, योजना, एप्रिल २००७
८. श्रीनिवास कुलकर्णी, ७३ व्या घटना दुरूस्ती व पंचायतराज चे अडथळे, हा संशोधन लेख, पंचायतराज, आक्टोंबर २००८.